"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२-०३
पुणे, दि. ११/११/०२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
विखे पाटील मेमोरियल स्कूल,
पुणे ५३.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ~~०२-०~~ ९३-९४.
~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~.

आपल्या डॉ. विखे पाटील फौंडेशन, पुणे या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित विखे पाटील मेमो. स्कूल, पुणे माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी /~~इ. ९ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन ~~२००~~ ९२ - ~~२००~~ ९३ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/१०९२/९२-९३, दि. ३१/८/९२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन ~~२००~~ ९३ - ~~२००~~ ९४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून ~~२००~~ ९३ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे / ~~सह शिक्षणाधिकारी, पं.स.~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

खरी नक्कल.

Sd/- x x x
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

J.N.H.
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे - १.

Principal
Vikhe Patil Memorial School
Pune - 411 016

## सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

२. विहित नमुन्यातील शिफारस पत्र [इंग्रजी व मराठी]

३. या कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

६. शाळा वार्षिक तपासणी अहवाल.

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली. ]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैरव्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्र दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

Principal
Vikhe Patil Memorial School
Pune - 411 016.